**बांधकाम विभागातील कामकाजाचे सुसूत्रिकरण आणि सुधारणाबाबत..**

जिल्हा परिषद अमरावती

क्रमांक जिप/मुकाअ/स्विस/३२/2017
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक - 7 एप्रिल, 2017

परिपत्रक

1. पार्श्वभूमी

राज्यातील अंदाजे ६० ते ७० टक्के लोकसंख्या ही ग्रामिण भागामध्ये राहत असल्याने तथा ग्रामिण भागातील विकासाच्या बहूतेक योजना हया जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येत असल्याने जिल्हा परिषदेला मिनी मंत्रालय सुद्धा संबोधण्यात येते.

कोणत्याही राज्याची प्रगती ही त्या राज्यात उपलब्ध असलेल्या मुलभूत सोई सुविधांवर अवलंबुन असते आणी हयाच मुलभुत सुविधा जसे दळण वळणाच्या सोई सुविधा जसे गावा-गावांना जोडणारे रस्ते, गावातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र,अंगणवाडी,गटारे, नाल्या बांधकाम, समाजमंदीर इत्यादी उपलब्ध करुन देण्याकरीता शासनाने मंजूर केलेल्या निधीचा योग्य/प्रभावी विनीयोग करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाची असते. त्यामुळे राज्याच्या एकंदर प्रगतीमध्ये जिल्हा परिषद,बांधकाम विभागाचे अनन्य साधारण महत्व आहे.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता अमरावती जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागास दिनांक 13 जानेवारी 2017 रोजी विविध खाते प्रमुखांचे उपस्थितीत विशेष चमूव्दारे तपासणी करण्यात आली असता सदर चमुने आपले अहवालात खालील प्रमाणे तपासणीचे निष्कर्ष दर्शविलेले आहेत.

**२. तपासणीचे निष्कर्ष:-**

- रोखपाल यांचे रोकड वही मधील व्यवहारामध्ये अनियमितता आढळून आली. संबंधीत रोखपालाने प्राप्त रोखड पैकी परिपूर्ण रक्कम बँक खात्यामध्ये एकमुष्त जमा केली नाही. रोकड वहीच्या दैनिक गोषवाऱ्यांमध्ये खोडतोड आढळून आली असून सदर नोंदीवर कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी घेण्यात आली नाही. पावती पुस्तके कधी प्राप्त झाली याबाबत आवश्यक नोंदी तपासणीमध्ये आढळुन आल्या नाही. रोकड वही मध्ये महिण्याचा घोषवारा काढण्यात आला नाही तसेच बँकेच्या पासबुकासोबत ताळमेळ घेतला नाही.

- भांडार शाखेतील देयकांची पडताळणी केली असता काही प्रकरणी साहीत्याचे दरपत्रक मंजुर करुन न घेता साहीत्य खरेदी करण्यात आल्याचे आढळुन आले. तसेच सदर प्रकरणी साहीत्य खरेदी केल्यानंतर दरपत्रक बोलावुन त्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
- सन २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंतचे साठा पंजीवर कार्यकारी अभियंता यांचे वस्तु शिल्लक/ निरंक याबाबतचे प्रमाणपत्र नाही. तसेच प्रत्येक वर्षाअखेर पडताळणी प्रमाणपत्र नाही.
- सन २०१२-१३ मध्ये कार्यालयाकरीता फर्निचर खरेदी अंतर्गत खर्चास व मालमत्ता संपादनास परवानगी घेतली नाही.
- निविदा शाखा तपासणीबाबतचे अभिप्राय :-
    १. करारनामा पंजी अद्यावत आढळुन आही नाही.
    २. काम वाटप पंजी अद्यावत आढळुन आही नाही.
    ३. ई-निविदा उघडण्याबाबतची पंजी अद्यावत आढळुन आही नाही.
    ४. शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजुर सहकारी संस्था व खुल्या पध्दतीमध्ये १५ लाखांच्या आतील कामांची विभागणी ३३:३३:३४ नुसार करणे गरजेचे असुन तसे केल्याचे आढळुन आले नाही व तशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.
    ५. बऱ्याच प्रकरणी बांधकामाचे करारनामा करतेवेळी १००/- चे मुद्रांकावर करारनामा केल्याचे आढळुन आलेले नाही.
    ६. जि.प.सर्वसाधारण सभांची मंजुरी प्राप्त असुनही ठरावाची प्रत अप्राप्त असल्यामुळे बऱ्याच कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आल्याचे आढळुन आले नाहीत.
    ७. करारनामा करतेवेळी आवश्यक २% सुरक्षा ठेव रक्कमेचा धनाकर्ष घेण्यात आला नाही.
- कोर्ट प्रकरणांची वर्षनिहाय नोंदवही ठेवण्यात आली नसून कोर्ट प्रकरणांच्या नोंदी एकत्रित घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे किती प्रकरणे सुरु आहेत किंवा प्रलंबित आहेत याचा बोध होत नाही.
- स्थानिक निधी लेखा यांचे एकूण १०९९ परिच्छेद प्रलंबित आहेत त्याबाबत विभागाने आवश्यक कार्यवाही केलेली नाही.
- प्रलंबित अग्रीमाचे समायोजन करण्यात आले नाही.
- सेवाजेष्ठता यादया वेळेवर प्रसिद्ध केलेल्या नाहीत.
- वेतन वाढी नोंद वहया ठेवण्यात आलेल्या नाहीत.
- लोकप्रतिनिधी तसेच वरिष्ठ अधिका-यांकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर विहीत मुदतीत कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

३. **<u>अभ्यास समितीचे निष्कृष</u>**

त्याअनुषंगाने बांधकाम विभागाच्या कामकाजाचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी कार्यकारी अभियंता (लघुसिंचन) यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. सदर समिती सदस्यांनी आपसात व वरिष्ठांशी चर्चा करुन पुढील प्रमाणे निष्कर्ष/अभिप्राय सादर केलेत.

- अपूरा व अप्रशिक्षीत कर्मचारी वर्ग.
- आवश्यक प्रमाणात लेखा संवर्गाचे कर्मचारी नाहीत.
- वर्ग-२ दर्जाचा लेखाधिकाऱ्याची नियुक्ती आवश्यक आहे.
- कामाच्या दर्जाबाबत सर्वात जास्त प्रमाणात तक्रारी येतात.
- स.प्र.अ. किंवा प्रशासन अधिकारी वर्ग-२ चे पद आवश्यक आहे.
- तांत्रीक व प्रशासकिय कामकाजावर विभाग प्रमुखांचे वचक नाही/ नियंत्रण नाही.
- योग्य व आवश्यकते नुसार कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येत नाही.
- काम वाटप समिती बाबत तक्रारी.
- कामांचे नियोजन प्राप्त/मंजूर नियतव्ययाचे प्रमाणाबाहेर करण्यात येते. (दायीत्व विचारात न घेता).
- ई-टेंडर बाबत तक्रारी.
- कामांचे अनावश्यक हेतुपुरस्सर तुकडे करण्यात येतात.
- पदाधिकाऱ्यांची नियम बाहय कामे करण्यात येत असल्याबाबतच्या तक्रारी वृत्तपत्र / सामाजिक संघटनेव्दारे प्राप्त होतात.
- प्रशासकीय मान्यतेबाबत योग्य नियोजन व पध्दत आवश्यक.
- विविध स्तरावरील पदाधिकारी जसे मा.आमदार/मा.खासदार/जि.प.सदस्य/पं.स.सदस्य/ग्रापंचायत पदाधिकारी यांचेकडून विविध बांधकामे मंजूर करण्याकरीता किंवा मंजूर कामे तातडीने पुर्ण करुन घेण्याकरीता बांधकाम विभागाकडे प्रचंड पाठपुरावा करुन वेळ प्रसंगी कठोर शब्दात संबंधीत अधिकाऱ्यांना जाब विचारतात अथवा आंदोलन / उपोषणाव्दारे आपली बाजु मांडतात. अशा वेळी कामे मंजूर करतांना अथवा कामे करतांना त्यामध्ये त्रुटया राहण्याची शक्यता असते.
- बांधकाम विभागातील कामांच्या नस्ती/फाईल्स कर्मचारी व्यतिरिक्त इतर अशासकीय व्यक्ती हाताळतात.

४. <u>सुधारणांची आवश्यकता</u> -

**उपरोक्त प्रमाणे आढळून आलेल्या त्रृटयांच्या अनुषंगाने बांधकाम विभागाच्या कामाचे सुसूत्रिकरण/नियमानुसार अंमलबजावणी करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असून तसे न केल्यास प्रशासकीय कामकाजावर खालील प्रमाणे विपरीत परिणाम होवू शकतो.**

- प्रशासकीय व तांत्रिक स्वरुपाच्या त्रुटया/उणिवा वारंवार होत असल्यास जिल्हा परिषदेची नाहक बदनामी होते.
- महालेखाकार, स्थानिक निधी लेखा तथा पंचायती राज समितीव्दारे जि.प.च्या कामकाजावर तिव्र ताशेरे ओढून सदर प्रकरणी लेखा आक्षेप सुद्धा घेण्यात येतात.
- सदर प्रकरणी कामकाजामध्ये सुसुत्रिकरण न केल्यास त्याचा विपरीत परिणाम जि.प.बांधकाम विभागात काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुद्धा होते. परिणामी अधिकारी/ कर्मचाऱ्यां विरुद्ध कारवाई प्रस्तावित होण्याची सर्वाधिक शक्यता असते.
- आर्थिक अनियमितता होण्यास वाव मिळेल.

**निष्कर्षाच्या अनुषंगाने केलेल्या / प्रस्तावित सुधारणा**

१. सदर प्रकरणी संबंधीत रोखपालाचे तात्काळ निलंबन करुन त्यांचे विरुद्ध खाते निहाय चौकशी सुरु करुन त्यांची पदस्थापना इतर विभागामध्ये करण्यात आली आहे. त्यांचे जागी लेखा संवर्गामधील कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे.

२. रोखपाल शाखा आणि निवीदा फार्म विक्रीची पध्दत पारदर्शक ठेवण्यासाठी निवीदा फार्म विक्रीची फी स्विकारण्याच्या पध्दतीमध्ये बदल करण्यांत आलेला असून सदरची फी आता ऑन लाईन थेट मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांचे खात्यात जमा करण्यांत येत असल्याने निवीदा फार्म घेण्यासाठी पारदर्शकता येईल. (संदर्भ-जिप/मुकाअ/स्विस/17/2017 दिनांक 16 मार्च, 2017 चे परीपत्रक)

३. भांडार शाखेमधील कर्मचाऱ्याचे जागी इतर कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच संबंधीत शाखेची विशेष चौकशी प्रस्तावित आहे.

४. निवीदा शाखेतील कर्मचाऱ्याचे तात्काळ निलंबन करुन संबंधीताची पदस्थापना इतर कार्यालयामध्ये करण्यात आली आहे. त्यांचे विरुद्ध खाते चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यांचे शाखेची विशेष चौकशी करण्यात आली असून चौकशी समितीच्या सुचनेनुसार निविदा शाखेची जबाबदारी शाखा अभियंता,स.ले.अ. व वरिष्ठ सहाय्यक यांना संयुक्तपणे सोपविण्यात आली असून त्यांचे कामकाजावर कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग यांना प्रत्यक्ष दर दिवशी नियंत्रण ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत.

५. सदर कक्षाची प्रचंड व्याप्ती लक्षात घेता मानव निर्मित चुका टाळण्याकरीता संगणकिय आज्ञावली (प्रणाली) राबविणे अपेक्षीत आहे. या अनुषंगाने निवीदा शाखेच्या नस्तींची संगणकीय FILE TRACKING SYSTEM प्रणाली विकसीत करण्यात येत आहे.

६. रु.3 लक्षचे आतील कामांचे तुकडे पाडून कामे होत असल्याच्या तक्रारी सन्मा लोकप्रतिनिधी तसेच नागरीकांकडून येत असल्याने आता मुळ किंमत रु 3.00 लक्षचे आतील अंदाजपत्रकास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची अनुमती अनिवार्य करण्यांत आलेली आहे. (संदर्भ जिप/मुकाअ/स्विस/15/2017 दिनांक 15 मार्च 2017 चे परीपत्रक)

७. गतवर्षी काही सन्मा.सदस्यांनी असे निदर्शनास आणून दिलेले आहे की, ऐनवेळी मंजूर केलेल्या कामात बदल करण्यांत येत असल्याने प्रशासकीय मान्यता /कार्यरंभ आदेश आणि निर्माण झालेले दायित्व यामध्ये विसंगती आढळून येते यासाठी सदर कार्यपध्दती सुलभ होण्यासाठी संगणक प्रणाली (SOFTWARE) तयार करण्यात आलेली आहे. समितीसभा/ जिल्हा परिषद सभेत मंजूर झालेल्या ठरावातील कार्यवाही कामांची यादी व तदअनुषंगीक कार्यवाही त्याद्वारे करण्यांत येत आहे.

८. बांधकाम विभागातील कार्यरत कर्मचा-यांचा आढावा घेवून आवश्यकतेनुसार ईतर विभागातील कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली.